# कोर्ट विद्यमान अपर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे समोर.

प्रकरण क्र.२५/एसआरव्ही-४३/मौजा-नागपूर/२०१७.

अपीलार्थी :- गोल्डब्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
तर्फे श्री.प्रतिक सरावजी,
राहणार- आनंदम वर्ल्ड सिटी,
कचाना रोड, रायपूर-४९२ ०७१.

Application No. 1520/18
Certified Copy of... order
Case No. 25/SRV-43/2017

-- विरुध्द --

गैरअपीलार्थी :- १. नगर भुमापन अधिकारी क्र.१, नागपूर.
२. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर.
३. उपविभागीय अधिकारी, नागपूर.

OFFICE OF THE COLLECTOR NAGPUR

## आदेश

(पारित दिनांक २२ जून, ~~२०१७~~ २०१८)

अपीलार्थी गोल्डब्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तर्फे श्री.प्रतिक सरावजी, राहणार- आनंदम वर्ल्ड सिटी, कचाना रोड, रायपूर-७१ यांनी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अंतर्गत उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी मौजा- नागपूर येथील प्रकरणात दिनांक १३.०३.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशाविरुध्द अपील अर्ज तसेच विलंब माफीचा अर्ज दिनांक १३.७.२०१७ रोजी दाखल केला आहे.

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या विलंब माफीचे अर्जावर सुनावणी होऊन तत्कालिन अपर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक १३.०७.२०१७ रोजी विलंब माफ करण्यात आला आहे.

अपीलार्थी यांनी अपील मेमोमध्ये असे नमूद केले की, अपीलार्थी हे मौजा- नागपूर, खसरा नं.४१९, ४२०, ४२४ व ४२६/१, सिटी सर्व्हे नंबर १०१ (पार्ट), शिट नं.२५९, २६०, २६९, २७० व २७१ मधील जमीनीचे मालक आहे. वरील सर्व्हे नंबर मधील १,४६,६८४ चौ.मि. जमीन नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांची मालकीची होती. त्यापैकी २८,२७० चौ.मि. जमीन एम.एस.ई.वी. यांना विक्री केली आहे व उर्वरित १,१७,२५७ चौ.मि. जमीन नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांनी अपीलार्थी यांना विक्री करुन दिली आहे. नॅशनल

अपर आयुक्त, नागपूर विभाग

टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांनी त्यांचे ताब्यातील जमीन मोजणी केली असता नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी १,४६,६८४ चौ.मि. जमीनीऐवजी १,०७,५६५.६८ चौ.मि. जमीन चुकीने दर्शविली आहे. तसेच ११५७ चौ.मि. (New Labour Chawl) जमीन नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांनी रॉय उद्योग लि. यांना विक्री करुन दिली आहे. अपीलार्थीस त्यांच्या ताब्यातील जमीन लिलावाव्दारे दिनांक २२.८.२००८ रोजी प्राप्त झाली आहे. उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी आदेश पारित करतेवेळी अपीलार्थी यांना पार्टी केले नाही तसेच अपीलार्थीस सुनावणी संधी दिली नाही. अपीलार्थीनी १,१७,२५७ चौ.मि. जमीन खरेदी केल्यानंतर लेआऊट व बांधकाम नकाशे मंजूर करुन जमीनीवर बांधकाम झाले असून अनेक लोकांना सदनिकांची विक्री केली आहे. मुळतः नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांचे नावे १,४६,६८४ चौ.मि. जमीन होती. त्यापैकी अपीलार्थीनी १,१७,२५७ चौ.मि. जमीन अपीलार्थीनी खरेदी केली आहे. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी पारित केलेले आदेश रद्द करुन नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांचे नावे एकूण १,४६,६८४ चौ.मि. जमीन दर्शवावी अशी विनंती अपीलार्थी यांनी केली आहे.

सदरचे प्रकरणात नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी दिनांक १९.३.२०१८ रोजी आपला अहवाल तसेच अभिलेख सादर केला आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले की, सदरचे प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांवरुन नियमाप्रमाणे रितसर संपूर्ण कार्यवाही झाल्याचे तसेच अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्यांचे व अभिलेखाचे बारकाईने अभ्यास करुन क्षेत्र व नकाशा दुरुस्तीचे आदेश उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी पारित केले आहे. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दिनांक १३.३.२००९ रोजीचा आदेश कायम करुन अपीलार्थी यांनी दाखल केलेले अपील नामंजूर करण्यात यावे असे नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी विनंती केली आहे.

अपीलार्थी यांनी आपला लेखी युक्तीवाद दिनांक १५.०६.२०१८ रोजी दाखल केला आहे. त्यात त्यांनी अपील मेमोतील सारखेच मुद्दे उपस्थित करुन अपीलार्थीनी खरेदी

केलेली १,१७,२५७ चौ.मि. जमीन अपीलार्थीचे नावाने दाखवावी तसेच नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांचे नावे एकूण १,४६,६८४ चौ.मि. जमीन दर्शवावी अशी विनंती अपीलार्थी यांनी केली आहे.

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे, लेखी युक्तीवादाचे, नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी दाखल केलेल्या अभिलेखाचे तसेच उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मौजा- नागपूर, शिट नंबर २५९, नगर भुमापन क्रमांक १०१ मधील १,४३,४२१ चौ.मि. क्षेत्र नॅशनल टेक्स्टाईल कॉरपोरेशन लि. यांचे नावे मिळकतीच्या आखिव पत्रिकेवर दाखल मुळे क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचे फेरफाराची नोंद घेण्यात आल्यामुळे सदरचे प्रकरणात जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांचेकडे पुर्नविलोकन करण्याची परवागनी मागितली होती. त्यानुसार सर्व संबंधीत जमीनधारकांना रितसर नोटीस बजावून दिनांक २०.४.२०१७, ९.५.२०१७, २६.५.२०१७ व ९.६.२०१७ रोजी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे. तसेच दिनांक १७.६.२०१७ रोजी मोक्यावर नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांनी चौकशी केली आहे. त्यामध्ये असून दिसून आले की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मे.गोल्डब्रिक्स ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व रॉय उद्योग लि. यांच्या नावे एकूण (२८,२७० चौ.मि. + १,१७,२५७ चौ.मि. + १,१५७.७ चौ.मि.) असे एकूण १,४६,६८४.७ चौ.मि. क्षेत्राची नोंद आखिव पत्रिकेमध्ये झाली होती. आखिव पत्रिकेत १,४३,४२१.० चौ.मि. मुळ क्षेत्राची नोंद असतांना, ३२६३.७ चौ.मि. अधिक क्षेत्राच्या फेरफार नोंदी आखिव पत्रिकेत झाल्या असल्याने तसेच अधिकच्या क्षेत्राच्या फेरफार नोंदी नियमाला धरुन नसल्यामुळे त्या नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत. मुळात नॅशनल टेक्सटाईल्स कारपोरेशन च्या ताब्यात असलेल्या जमीनीची विक्री खुल्या लिलावाव्दारे करण्यात आली आहे. या मालमत्तेच्या चतुर्सिमेबाबत कुठलाही वाद उदभवलेला नाही. चर्तुसिमा देखिल बदललेली नाही. या परिसरात पूर्वी सुध्दा कुठल्याही प्रकारे शिल्लक जमीनीची नोंद ना अभिलेखात आहे, ना नकाशामध्ये दर्शविली गेली. नॅशनल टेक्सटाईल्स कारपोरेशन ने जाहिर लिलावाव्दारे १,४६,६८४.७ चौ.मि. जमीनीची विक्री केली आहे. तिन्ही यशस्वी

जिल्हाधिकाऱ्यांनी त्यातून त्यांचे आवश्यकतेनुसार शासनास त्याचे मुल्य भरुन दिले आहे. अपीलार्थीने १,१७,२५७ चौ.मि. क्षेत्राचे मुल्य शासनास दिले. त्यामुळे नॅशनल टेक्सटाईल्स कारपोरेशन च्या वहिवाटीतील व कुठलाही वाद नसलेल्या जमीनीचे जे क्षेत्र होते तेच उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी आखिव पत्रिकेत नोंदवणे अभिप्रेत होते. त्यांनी त्याऐवजी १,४३,४२१ चौ.मि. क्षेत्र का नोंदविले याचा खुलासा/तर्क आपल्या आदेशात केलेला नाही.

सबब पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अपीलार्थी यांनी दाखल केलेली अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दि.१३.०३.२००९ रोजी पारित केलेले आदेश रद्द करण्यात येत आहे.

(३) अपीलार्थी यांचे नावे १,१७,२५७ चौ.मि. क्षेत्र नोंदविण्यात यावे.

(आर.एच.ठाकरे)
अपर आयुक्त, नागपूर विभाग,
नागपूर.

COLLECTOR NAGPUR

OFFICE OF THE COLLECTOR NAGPUR

अपर आयुक्त, नागपूर विभाग

TRUE COPY
Head Copyist
Collectorate Nagpur

Date of Application 20/7/18
Told to appear on 20/7/18
Date of appearance 20/7/18
Copy ready 20/7/18
Copy delivered 20/7/18
Cost of 20/7/18
Copied by Compared by Head Copyist
Collectorate Nagp

Received Rs 60/- in words
Rupees Sixty Rs
as fees for this certified copy.
20/7/18
Head Copyist
Collectorate Nagpur